


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १९६, मंगळवार १६ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विखे-पिता पुत्र ढोंगी !

## ■ मा. आ. दादाभाऊ कळमकर यांचे टिकास्त्र
## ■ सुप्यात जनसंवाद यात्रेनिमित्त सभा

सुपा : विशेष प्रतिनिधी

**विखे-पिता पुत्र हे इतरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करीत आहेत. दुसरीकडे त्यांच्याच कारखान्यात १९१ कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार पोलीसांत करण्यात आली आहे. खा विखे यांच्या पणजोबांनी सुरू केलेला आशिया खंडातील पहिला साखर कारखाना आजही ८५० कोटी रूपये तोटयात आहे. त्यांच्यानंतर सुरू झालेले कारखाने कर्जमुक्त आहेत. लोकांची दिशाभुल करणारे विखे पिता-पुत्र ढोंगी असल्याची टीका माजी आमदार दादाभाऊ, कळमकर यांनी केली.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार नीलेश लंके यांनी १ एप्रिलपासून सुरू केलेली स्वाभिमान जनसंवाद यात्रा सुपे यथे पोहचल्यानंतर नगर तालुक्यातील काही गावे तसेच सुपा गटातील कार्यकर्ते, नागरीकांशी लंके यांनी संवाद साधला. लंके यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना यावेळी सुचना करून गांभीर्याने निवडणूक हाताळण्याचा सल्ला दिला.

कळमकर म्हणाले, शिक्षण संस्थेत मुलांना प्रवेश मिळेल या आशेने त्या काळात शेतकऱ्यांनी बाळासाहेब विखे यांना मतदान केले. त्यानंतर मात्र त्यांचा भ्रमनिरास झाला. पाच वर्षात सुजय विखे यांनी काय केले ? साधा फोनही ते घेत नाहीत. अशा व्यक्तीला लोक मतदान करणार नाहीत. मागील वेळी शिकलेला उमेदवार म्हणून लोकांनी मतदान केले मात्र मतदारांचा भ्रमनिरास झाल्याचे कळमकर यांनी सांगितले.

नीलेश लंके म्हणाले, विधानसभेचा राजीनामा देऊन आपण आपला डाव उधळला असून उधळलेला हा डाव पुन्हा जुळवून लोकसभा निवडणूकीत आपणास तालुक्यातून एक लाखांचे मताधिक्य घ्यायचे असल्याचे नीलेश लंके यांनी सांगितले.
लंके म्हणाले, एकमेकांमधील हेवेदावे दुर ठेवा कारण त्याचा फटका थेट मला बसणार आहे. रूसव्या फुगव्यामुळे एका बुथववर ५० मते गेली तर १५ हजार मतांचा फटका बसेल. गुलाबराव शेळके यांच्यानंतर आपणास संधी आहे. आमदारकीचा राजीनामा देऊन आपण डाव उधळला आहे. तो पुन्हा जुळवून ही निवडणूक जिंकायचीच आहे.

लंके पुढे म्हणाले, कार्यकर्त्यांनी ॲक्टीव मोडवर यायला हवे. सोशल मीडियावर फार लक्ष देऊ नका. विविध कार्यकर्ते वेगवेगळया तालुक्यात गेले आहेत. दोन नंबरच्या फळीतील कार्यकर्त्यांनी गांभीर्याने कामाला लागावे. कोणी विरोधात बोलले तर त्याला उत्तर देण्याच्या भानगडीत पडू नका. आपण मतपेटीतून त्याला उत्तर देऊ. डोक्यावर बर्फ ठेऊन काम करण्याचा सल्ला लंके यांनी दिला.

यावेळी खंडू भुकन, किसनराव रासकर, बापूसाहेब भापकर, नगरसेविका प्रियंका औटी, राधाकृष्ण वाळुंज, मा. सभापती रामदास भोर, संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, माउली कळमकर, रामदास गोल्हार, दिपक पवार, बापूसाहेब भापकर, पुनम मुंगसे, मा. सभापती नंदाताई शेंडगे यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



■ स्वाभिमान जनसंवाद यात्रेनिमित्त सुपा येथे नीलेश लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

### एकलव्य संघटनेचा पाठींबा

यावेळी एकलव्य संघटनेच्या वतीने यावेळी नीलेश लंके यांना पाठींबा जाहिर करण्यात आला. एकलव्य संघटनेचे ९६ हजार कार्यकर्ते आहेत. ही सर्व टीम नीलेश लंके यांच्यासोबत आहे. मतदारसंघातील वातावरण पाहिले तर गुलाल आपलाच असल्याचे संघटनेच्या वतीने यावेळी सांगण्यात आले.

### लंके यांचे त्सुनामी

या निवडणूकीत नीलेश लंके यांची त्सुनामी आलेली आहे. येत्या १३ तारखेला पारनेरसह इतर तालुक्यांमध्ये लंके यांना भरभरून मतदान होणार आहे. प्रत्येक तालुक्याचे अहवाल अतिशय चांगले असून तालुके तालुके मताधिक्क्याची चढाओढ करू लागले आहेत.

**दादाभाऊ कळमकर**
मा.आमदार

### ४ जुनला गुलाल घेऊनच येणार

गेल्या दोन वर्षांपासून नीलेश लंके हे निवडणूकीची तयारी करत आहेत. त्यामुळे आज या निवडणूकीत उत्साह दिसत आहेत. सर्वसामान्य घरातील आपला प्रतिनिधी दिल्लीला जावा यासाठी मी स्वतः नीलेश लंके असे समजून सर्व कार्यकर्ते काम करीत असून ४ जून रोजी आपण गुलाल घेऊनच येणार आहोत.

**भगवान फुलसौंदर**
मा. महापौर

### तेलबिया प्रकल्प कुठे गेला ?

सामान्य माणूस खानदानी माणसाच्या पोटात दुखू लागते. रांजणगांवमध्ये ९ हजार एकराने १०० एकर जमीन घेतली. तेलबिया प्रकल्प आणू नोकऱ्या देऊ असे सांगितले. किती पिढया गेल्या कुठे आहे तेलबिया प्रकल्प ? राहुल शिंदे यांनी रांजणगांव मशीदमध्ये किती निधी आणला. नीलेश लंके यांनी २७ ते २८ कोटी रूपयांचा निधी गावाला दिला. शिंदे यांच्या किती पिढया गेल्या किती निधी आणला. शिरूरमध्ये सापडलेले ५१ लाख रूपये कोणाचे ? त्यासाठी पोलीस ठाण्यात कोण जाऊन बसले होते ?

**सुवर्णा धाडगे**
महिला आघाडी तालुकाध्यक्ष

### मोठया घरच मुले हुड !

विरोधी उमेदवार म्हणतात आम्ही पारनेर तालुक्यात सर्वाधिक लिड घेणार. जिथे पारनेर तालुका लंके यांना होणाऱ्या मतदानापैकी ऐंशी टक्के मतदान करणार आहेत. मोठया घरची मुले हुड असतात असे माझी आजी सांगायची. तसाच हुडपणा करून ते गैरसमज निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न ते करीत आहेत. तुमच्या फेकलेल्या तुकडयावर जगणारी फक्त काही गावकारभारी आहेत. सर्वसामान्य जनता लंके साहेबांच्या बरोबर आहे.पोलखोल करणार असे सांगतात. आम्हीही पोलखोल करू शकतो. मात्र आम्ही आमच्या कामाच्या जोरावर मते मागत असल्याचे राणीताई यादव यांनी सांगितले.

### मिस गाईड करण्याचा प्रयत्न होतोय

गावात बसा, बुथच्या याद्या तयार करा. बहुतांश बुथच्या याद्या तयार असल्या तरी काही गावांच्या याद्या आलेल्या नाहीत, त्या कार्यालयाकडे पाठवा. निवडणूक कागदावर घ्या, घराघरात पोहचा. असे केले तर आपले मताधिक्य एक लाखांच्या पुढे जाईल. मीस गाईड करण्याचा प्रयत्न केला जातोय, त्याकडे दुर्लक्ष करा असा सल्ला लंके यांनी दिला.

### मोडेल पण वाकरणार नाही

मी सर्वसामान्य महिला आहे. मी लंके यांच्या बाजूने म्हणून आमच्या पंपावर चार चार वेळा धाडी टाकण्यात आल्या. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या छत्रछायेखाली राहतो. आम्ही स्वाभिमानी आहोत. मोडेल परंतू वाकणार नाही.

**नंदाताई शेंडगे**
मा. सभापती, नगर

### तर आपला कडेलोट होईल

आज आपण अशा उंचीवर आहोत की गांभीर्याने निवडणूक घेतली तर आपण झेंडा रोऊ शकतो. तुम्ही दुर्लक्ष केले तर आपला कडेलोट होऊ शकतो. विरोधकांनी पंधरा दिवसांत तालुक्यात ३६ सभा घेतल्या आहेत. त्यांनी तालुक्याला टार्गेट केले असल्याने सतर्क राहण्याचे आवाहन लंके यांनी केले.

### एक लाखांचे मताधिक्य घ्यायचेय

तालुक्याच्या अस्मितेचा, स्वाभिमानाचा प्रश्न आहे म्हणून गावागावांमध्ये ठराव करा.कोणी गावात वातावरण दुषीत करणार असेल तर ते थांबवा. विधानभेला साठ हजारांचे मताधिक्य होते. लोकसभेला मतदारसंघातून एक लाखांचे मताधिक्य घ्यायचे आहे असे नियोजन करण्याचे आवाहन लंके यांनी केले.

### विखेंचे क्रुरतेचे राजकारण

निवृत्ती गाडगे यांच्या स्थानिक वादानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन कारवाईची संरक्षणाची मागणी करण्यात आली. जे गुन्हेगार आहेत तेच निवेदन देण्यासाठी पुढे गेले होते. या घटनेशी माझा काही संबंध नसताना तो जोडण्यात आला. बातम्या रंगविल्या गेल्या. विखे यांचे राजकारण क्रुरतेने सुरू आहे. राजकारणातील संस्कृती त्यांच्याकडे नाही. सहानुभुती मिळविण्यासाठी त्यांचे काहीही करण्याची तयारी आहे. तुम्ही फक्त सतर्क रहा. विधानसभा निवडणूकीपेक्षा दहा पट वातावरण चांगले आहे असा दावा लंके यांनी केला.

### पैज कोण जिंकणार ?

उमेदवार तुमचा पारनेर तालुका आणि नगर तालुक्याच्या मताधिक्क्याची स्पर्धा लावायची आहे. बाळसाहेब हराळ, संदेश कार्ले यांच्यासह सहा जिल्हा परिषद सदस्य महाविकास आघाडीचे आहेत. आम्ही पुढे गेलो तर विधानसभा निवडणूकीची उमेदवारी नगरला द्यावी लागेल असे प्रा. शशिकांत गाडे यांनी सांगताच नगर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी टाळया वाजवत गाडे यांच्या मागणीस प्रतिसाद दिला. तर पैज आम्हीच जिंकणार असा विश्वास पारनेरच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

### मटण दिले भाकरी का दिल्या नाही

विरोधकांनी पानोलीमध्ये मटण दिले, भाकरी मात्र दिल्या नाहीत. तुम्हाला भाकरी द्यायच्या नव्हत्या मग ते मटण तरी कशाला दिले असा सवाल पानोली येथील राधिका गाडेकर या महिलेने केला.

### पाहुणा माझेच घर असल्याचे म्हणू लागलाय

सामान्य मतदारांनी हाती घेतलेली ही पहिलीच निवडणूक पाहुण्याने पाहुण्यासारखे पाहिले पाहिजे. पाच वर्षे सत्ता दिली. आलेला पाहुणा माझेच घर असल्याचे म्हणू लागला असून उत्तरेचे हे पार्सल आपणास परत पाठवायचे आहे. संपूर्ण मतदारसंघात लंके यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. ही निवडणूक जनतेने हाती घेतले असून नीलेश लंके यांचा विजय निश्चित आहे.

**रा.या.औटी**

### शिंदे यांची चिडचिड

शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार यांच्यामध्ये भाजपाच्या विरोधात असंतोष आहे. नगर मतदारसंघात सर्वसामान्य जनता लंके यांच्या पाठीशी आहे. विरोधकांकडे काहीही भांडवल नाही. लंके यांना प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने वाडेगव्हाण येथील झालेल्या सभेत राहुल शिंदे यांनी चिडून भाषण केले. जो त्यांचा स्वभाव नाही. यावरून त्यांची चिडचिड सुरु झाली असल्याचे दिसून येते.

**विजय पवार**
संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती

### युवकांची भुमिका महत्वाची

या निवडणूकीत युवकांची भुमिका महत्वाची आहे. नीलेश लंके यांचे काम जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम युवकांनी केले पाहिजे. २५ वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून काम केलेल्या आमदारापेक्षा अधिक काम लंके यांनी पाच वर्षात केले आहे. युवकांच्या भवितव्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे.

**ओंकार गारूडकर**

### कमी लिड मिळाले तर गावात जाणार नाही

पारनेर तालुक्यातून लिड घेणार असे विरोधक सांगतात. नीलेश लंके यांनी या तालुक्याच्या विकासासाठी, सर्वसामान्यांच्या हितासाठी रक्ताचे पाणी केले आहे. तालुक्यातून एक लाखापेक्षा कमी लिड मिळाले तर मी माझ्या गावात जाणार नाही असे आव्हान इंजिनिअर सतिश भालेकर यांनी दिले.

### त्यांना स्वतःची पोळी भाजून घ्यायची आहे

तरूणांना रोजगार मिळाला पाहिजे, औद्योगिक वसाहतीमध्ये कंपन्या आल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न करायचे की बदनामी करून वातावरण गढूळ करायचे ? विरोधकांना तरूणांचा रोजगार, किंवा उद्योग वाढविण्याबाबत काहीही घेणे देणे नाही यांना फक्त स्वतःची घरे भरायची आहेत. राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे. एमआयडीसी वाढत आहे याचे श्रेय केवळ नीलेश लंके यांनाच आहे तेच त्यांचा खुपते आहे.

**इंजिनिअर सतिश भालेकर**

### वातावरण आणि हवा लंके यांचीच

लोकांनी लोकांसाठी निवडलेला नेता म्हणजे नीलेश लंके. पंढरपूरच्या वारीत प्रचंड जनमसुदाय असतो. प्रत्येक भक्ताच्या मनात विठुरायाचा प्रेमाचा भाव असतो. अगदी त्याच प्रमाणे आम्हाला आमच्यातला माणूस लोकप्रतिनिधी पाहिजे. ही प्रत्येकाच्या -हदयातून निघणारी स्पंदने आहेत. वातारण आणि हवा लंके साहेबांचीच आहे. उसळलेली ही लाट थोपविणे कधीही शक्य होणार नाही. नीलेश लंके यांची बरोबरी कोणी करू शकणार नाही, असे राणीताई यादव यांनी सांगितले.

### अशी निवडणूक पाहिली नाही

मी बऱ्याच निवडणूका लढविल्या. मात्र अशी निवडणूक पाहिली नाही. लोकांनीच निवडणूक हाती घेतली आहे. संवाद यात्रा चार ते पाच तास उशिरा पोहचूनही नागरीक गावागावांमध्ये वाट पाहत आहेत असे चित्र गावोगावी पहावयास मिळाल्याचे लंके म्हणाले.

### तालुका फोकस करण्याचा प्रयत्न

आपल्या तालुक्याला फोकस करण्याचा प्रयत्न सुरू आहे. लोकांना पैशांचे आमिष दाखविण्यात येत आहे. भांडणे मारामाऱ्या करून सहानुभुती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. आमरस, मटणाची जेवणे सुरू आहेत. कार्यकर्त्यांनी सतर्क राहिले पाहीजे. आपल्याला आपल्या तालुक्यातून किमान एक लाखांची आघाडी घ्यायची असल्याचे लंके म्हणाले.

### सुक्ष्म पध्दतीने काम करा

समोरचे लोक गोड बोलतील त्यांच्या अमिशांना बळी पडू नका. नेते त्यांचे काम करतील. त्यांना सोडून द्या. तुम्ही तुमच्या पध्दतीने सुक्ष्म पध्दतीने काम सुरू करा असे लंके म्हणाले.

### टीका टिपन्नीकडे दुर्लक्ष करा

विखे यांच्यासोबत तालुक्यातील पाच घराणे आहेत. सहावे घर त्यांनी जवळ केले नाही. हे लोकांना समजून सांगा. कोणी काही म्हणू द्या. कोणत्याही टीका टिपन्नीकडे दुर्लक्ष करा. त्यांना महत्व देऊ नका. निवडणूक आपल्या हातात आहे. तुमच्या कामातील सातत्य ठेवण्याचा सल्ला लंके यांनी दिला.

### गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न

लिंपणगाव येथील वादाशी आपला काही सबंध नव्हता. स्थानिक मंदिराचा वाद होता. परंतू माध्यमांमधून चुकीच्या बातम्या प्रसिध्द करून आणून गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्याचा उपयोग होणार नसल्याचे लंके म्हणाले.

### मताधिक्यामध्ये वाढ होणार

तालुक्यात शिवसेना व राष्ट्रवादी याच दोन प्रमुख ताकद आहेत. आता महाविकास आघाडीमध्ये दोन्ही पक्ष असल्याने कोणी कितीही वल्गना केल्या तरी आपल्या मताधिक्क्यामध्ये मोठी वाढ होणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### अस्तित्वाची लढाई

ही आपल्या अस्तित्वाची लढाई आहे. इतर तालुक्यातील वातावरण अतिशय चांगले आहेत. ठिकठिकाणच्या समन्वयकांनी चांगले नियोजन केले असून मतदानापर्यंत हेच वातावरण टीकवून ठेवण्याची जबादारी त्यांनी घेतली असल्याचे लंके यांनी सांगितले.

### तुतारी घरोघर पोहचवा

जनतेमध्ये भाजपाविरोधात रोष आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या तुतारी हे चिन्ह घराघरात पोहचविणे गरजेचे आहे. आजही २५ टक्के लोकांपर्यंत चिन्ह पोहचले नाही. घरोघर चिन्ह पोहचविण्याची काळजी प्रत्येक कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे असे लंके म्हणाले.

### नातेवाईकांची यादी तयार करा

नातेवाईकांची यादी तयार करा. किमान २० हजार नातेवाईकांची यादी तयार करून संपर्क केला तर त्याचा मोठा फायदा होणार आहे. तुमची यादी संपर्क कार्यालयाकडे पाठवा, कार्यालयाकडूनही त्या पाहुण्यांची संपर्क करण्यात येईल असे लंके म्हणाले.

Sanskar Pratishthan's

DBM English Medium School STATE BOARD
DBM International School CBSE PATTERN

REQUIRED TEACHERS 2024-25



We are looking for **Passionate experienced / Fresher, innovative and qualified teachers** with good communication skills and fluency in English for following Classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre- Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted | 5 |
| 2 | Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted / B.Ed. | 4 |
| 3 | Math's | B.sc/ M.sc/ B.Ed. | 2 |
| 4 | Science | B.sc/ M.Sc. B.Ed. | 2 |
| 5 | STT | B.A./M.A. B.Ed / ( His/ Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 7 | Marathi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 8 | Hindi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Computer Knowledge | 1 |


**Walk – in Interview with all original documents On Thursday 25 April 2024, 10.00 AM to 3.00 PM at Above Address**

Note: *Salary commensurate based on Skill, qualification and Experience.
* Bus Facility will be provided.
* Training will be provided to fresher candidate who are passionate about Education.

A/P-Ralegan Siddhi,Tal.Parner,Dist.Ahmednagar
P.H. 7666120168,9422755191,7083758198

# चंदेरी

# नोरा ५ हजार रुपये घेऊन आली होती मुंबईत...



**कुणाल खेमू दिग्दर्शित 'मडगाव एक्स्प्रेस' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. या चित्रपटाचं कौतुक देखील होत आहे. या चित्रपटात दिव्येंदू शर्मा, प्रतिक गांधी, अविनाश तिवारी, उपेंद्र लिमये, छाया कदम हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. याशिवाय या चित्रपटात ग्लॅमरस डान्सर, अभिनेत्री नोरा फतेही झळकली आहे. या चित्रपटामुळे सध्या नोरा चर्चेत आली आहे.**

'मडगाव एक्स्प्रेस' या चित्रपटाच्या निमित्ताने नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला. ती म्हणाली, की जेव्हा मी मुंबईत पहिल्यांदा आली, तेव्हा माझ्याजवळ ५ हजार रुपये होते. यावेळेस मला १०० डॉलर म्हणजे किती असतात हे अजिबात माहीत नव्हतं. मी एका अपार्टमेंटमध्ये राहत होते. थ्री-बीएचके घर होतं. प्रत्येक रुममध्ये तीन मुली राहत होत्या, अशा एकूण नऊ वेड्या मुलींबरोबर मी राहत होते. हे माझ्यासाठी ट्रॉमापेक्षा काही कमी नव्हतं. कधी कधी मला असं वाटायचं की, माझा भारतात येण्याचा निर्णय योग्य होता की चुकीचा होता. त्यानंतर नोरा म्हणाली, की संघर्षाच्या काळात माझ्याकडे खूप कमी पैसे होते. त्यामुळे मी फक्त अंडी आणि ब्रेड खाऊन दिवस काढले. माझ्या घराचं भाडं मी ज्या एजन्सीत काम करत होती तेच देत होते. पण माझ्या पगारातून घराचं भाडं



कापलं जात होतं. त्यामुळे माझ्या हातात येणारा पगार खूप कमी होता. त्या पगारात मुंबईसारख्या शहरात राहणं खूप कठीण आहे, असे ती म्हणाली. याआधीही अनेकदा नोराने तिच्या संघर्षाविषयी सांगितले आहे. २०१९मध्ये एका मुलाखतीमध्ये ती म्हणाली होती, की संघर्षाच्या काळात ज्या एजन्सीत काम केलं ते आठवड्याचे फक्त तीन हजार रुपये देत होती. त्यामुळे संपूर्ण घर खर्च करून आठवड्याच्या शेवटी हातात पैसे नसायचे. दरम्यान, नोरा ३२ वर्षांची आहे. या वयात ती बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. नोराने टेलिव्हिजनवरील अनेक डान्स रिॲलिटी शोचे परीक्षण केलं होतं. याशिवाय ती 'स्त्री', 'बाटला हाउस', 'बाहुबली द बिगनिंग', 'क्रॅंक' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे. नोराच्या अभिनयापेक्षा तिच्या डान्सचे लाखो चाहते आहेत.

# 'नाच गं घुमा'साठी मानधन घेण्यास मुक्ता बर्वेचा नकार


'नाच गं घुमा' चित्रपटाचं सध्या जोरदार प्रमोशन सुरू आहे. 'बाईपण भारी देवा', 'झिम्मा' यांसारख्या चित्रपटांनंतर 'नाच गं घुमा' हा स्त्रीप्रधान चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. परेश मोकाशी दिग्दर्शित आणि मधुगंधा कुलकर्णी लिखित हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित होणार आहे. मुक्ता बर्वेने या चित्रपटासाठी कोणतही मानधन न घेण्याचं जणू जाहीरचं केलं होतं. याबद्दल लेखिका मधुगंधाने एका मुलाखतीत खुलासा केला आहे. मधुगंधा म्हणाली, की मुक्ता एक अभिनेत्री म्हणून मला खूप आवडते. मुक्ताने या चित्रपटाला होकार दिल्यानंतर पहिलं तिच वाक्य होतं की मला काहीही देऊ नकोस, मला शून्य पैसे दे. माझ्यावर जे पैसे खर्च होणार आहेत. ते तू मेकअप, हेअर्स आणि प्रोडक्टवर खर्च कर. आजकालच्या जगामध्ये हिच्यासारखी अभिनेत्री जेव्हा असं म्हणते तेव्हा खरंच खूप अभिमान वाटतो. मी अशी आशा करते की पुढच्या चित्रपटामध्ये माझ्याकडे एवढे पैसे यावेत की अभिनेत्री म्हणून नाही तर पार्टनर म्हणून मी तिला सामील करू शकेन, असे मधुगंधा म्हणाली.



मुक्ताच्या अभिनयाचं कौतुक करत मधुगंधा म्हणाली, की या चित्रपटात मुक्ताने अप्रतिम काम केलं आहे. मुक्ता भारतीय सिनेसृष्टीतील सर्वात उत्तम अभिनेत्री आहे.

मुक्ता आणि नमाची केमिस्ट्री स्क्रीनवर बघणं एक ट्रीट आहे. सारंग आणि मुक्ता या कपलचं कॉम्बिनेशनपण खूप सुंदर दिसतंय, असे ती म्हणाली. 'नाच गं घुमा'चं प्रमोशनल गाणं नुकतंच प्रदर्शित झालं आणि या गाण्यावर रिल बनवणाऱ्या प्रेक्षकांना या टीमने बक्षीसदेखील जाहीर केलं आहे. या चित्रपटात मुक्ताने गाणंदेखील गायलं आहे. दरम्यान, 'नाच गं घुमा' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं तर १ मे २०२४ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मुक्ता बर्वेसह नम्रता संभेराव, सुप्रिया पाठारे, सुकन्या माने, शर्मिष्ठा राऊत, सारंग साठ्ये यांच्याही या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका आहेत.

# नीलेश साबळे, भाऊ कदम अन् ओंकार भोजने पुन्हा एकत्र



हसतायं ना... हसायलाच पाहिजे, असं म्हणत घराघरात पोहोचलेले लोकप्रिय निवेदक, अभिनेते, दिग्दर्शक नीलेश साबळे यांनी 'झी मराठी'वरील 'चला हवा येऊ द्या' मधून काही महिन्यांपूर्वी एक्झिट घेतली. त्यानंतर 'चला हवा येऊ द्या' कार्यक्रमानेच प्रेक्षकांचा निरोप घेतला. गेली १० वर्षे प्रेक्षकांचं मनोरंजन करत असलेला हा कार्यक्रम बंद होणार असल्याची चर्चा वर्षभरापासून सुरू होती. अखेर काही दिवसांपूर्वी 'चला हवा येऊ द्या' हा लोकप्रिय विनोदी कार्यक्रम ऑफ एअर झाला. पण आता नीलेश साबळे, भाऊ कदम व ओंकार भोजने हे महाराष्ट्राच्या रसिक प्रेक्षकांना पुन्हा खळखळून हसवण्यासाठी येत आहेत. 'हसतायं ना? हसायलाच पाहिजे' या नव्या कार्यक्रमातून विनोदाचे हे तीन हुकमी एक्के प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहेत. हा नवा कार्यक्रम 'कलर्स मराठी' वाहिनीवर पाहायला मिळणार आहे. या विनोदी कार्यक्रमाचं लेखन, दिग्दर्शन, सूत्रसंचालन अशी संपूर्ण धुरा म्हणजेच कॅप्टन ऑफ द शीप असणार आहेत

# अभिनेत्री आरती सिंह करतेय अरेंज मॅरेज

गोविंदाची भाची आणि प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार असून, तिने लग्नाची तारीख सांगितली आहे. ती २५ एप्रिलला लग्न करणार आहे. तिच्या होणाऱ्या पतीचं नाव दीपक चौहान आहे. तिचं हे अरेंज मॅरेज आहे. दीपक नवी मुंबईत व्यावसायिक आहे. मेहंदी, हळद व २५ एप्रिलला लग्न असेल, असं आरतीने सांगितलं. तिने दीपकशी भेट कशी व केव्हा झाली, याबाबतही सांगितले.



आरती म्हणाली, की मागच्या वर्षी २३ जुलैला आम्ही पहिल्यांदा बोललो. ५ ऑगस्टला पहिल्यांदा भेटलो. नंतर भेटीगाठी वाढल्या. नोव्हेंबरमध्ये लग्नाचं ठरवलं. पण दोन्ही कुटुंबांनी होकार देईपर्यंत आम्ही पुढे गेलो नाही. १ जानेवारीला दीपकने मला दिल्लीतील माझ्या गुरुजींच्या मंदिरात लग्नासाठी मागणी घातली आणि मी हो म्हणाले. तिथेच साखरपुडा झाला, असं मी मानते. दीपकचा स्वभाव शांत असल्याचं आरतीने सांगितलं. अरेंज मॅरेजमध्ये एखाद्याला भेटताना शंका असतात. काही अडचणी येतात. पण दीपकला भेटल्यावर मात्र काहीच वाटलं नाही. आमच्यात मैत्री झाली आहे. तो माझ्या आयुष्यात शांतता आणतो. मी नशीबवान आहे की तो माझ्या आयुष्यात आला. मी जशी आहे तशीच त्याच्यासह, त्याच्या दोन बहिणी व त्याच्या वडिलांसमोर वागू शकते, मी आधीच लग्न केलं नाही ते बरं झालं. योग्य वेळेत सगळ्या चांगल्या गोष्टी घडत आहेत आणि आता माझी नात्यांची समज वाढली आहे, असं आरती म्हणाली. हनिमूनबद्दल विचारल्यावर आरती म्हणाली, की आम्ही त्याबद्दल चर्चा करतोय, पण अजून काही ठरलं नाही. लग्नानंतर मंदिरात जाण्यास माझं प्राधान्य आहे. मी आमचं नवीन घर सजवण्यास खूप उत्सुक आहे. कारण ते माझ्यासाठी हनिमूनपेक्षा जास्त महत्त्वाचं आहे, असे ती म्हणाली. मामा गोविंदाला लग्नाबाबत सांगितलंय का, असं विचारल्यावर आरती म्हणाली, की मी चिचीमामाला माझ्या लग्नाबद्दल सांगितलं आहे. मामा माझ्यासाठी खूप आनंदी आहेत. त्यांचं माझ्यावर खूप प्रेम आहे, असेही ती म्हणाली.

# सई ताम्हणकर साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत

मराठमोळ्या सई ताम्हणकरने गेल्या काही वर्षांत मराठीसह बॉलीवूड चित्रपटांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'भक्षक' चित्रपटात तिने भूमी पेडणेकरबरोबर स्क्रीन शेअर केली होती. याशिवाय सई लवकरच फरहान




अख्तरच्या 'डब्बा कार्टेल'मध्ये महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. एकंदर २०२४ मध्ये सई बॉलीवूड गाजवण्यासाठी सज्ज झाली आहे. याच पार्श्वभूमीवर सईने शिर्डीच्या साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

सई म्हणाली, की येत्या काळात माझे खूप प्रोजेक्ट पडद्यावर येणार आहेत. मंदिरात येऊन खरंच फार छान वाटतं. मंदिरातील स्वच्छता, नियोजन या सगळ्या गोष्टी पाहून मन प्रसन्न होतं. योग्य नियोजनामुळेच प्रचंड गर्दीतही शिर्डीला आलेल्या भाविकांना चांगलं दर्शन मिळतं, असा माझा अनुभव आहे, असं सई ताम्हणकरने सांगितलं. सईला राजकीय परिस्थिती व निवडणुकांबद्दल विचारलं असता म्हणाली, की आम्ही एखादा चित्रपट केला तर तो किती कलेक्शन करेल याबाबत आपल्याला काहीच माहिती नसते. तसंच राजकारणातसुद्धा आहे. हा सगळा वेट अँड वॉचचा गेम आहे. येत्या काळात आपल्यासमोर चित्र स्पष्ट होईलच. राजकारणात आता नवीन पिढी येऊ पाहतेय आणि नवीन विचारसरणीसुद्धा रुजू होऊ पाहत आहेत. गेल्या काही वर्षांत आपण डिजिटली खूप प्रगती केलीये आणि ही चांगली गोष्ट आहे. बाकी इतर गोष्टी येत्या काळात स्पष्ट होतील, असे ती म्हणाली.

# मृणालला नाही आवडत कपड्यांवर जास्त खर्च

**कलाक्षेत्रात दमदार अभिनयाने वेगळा ठसा उमटवणारी मृणाल ठाकूर 'फॅमिली स्टार' या आगामी चित्रपटात मृणाल विजय देवरकोंडासह झळकणार आहे. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत कपड्यांवर वायफळ खर्च करणं हे तिला व्यर्थ वाटत असल्याचं तिने म्हटलं आहे.**

मृणाल म्हणाली, की डिझायनर कपड्यांवर मला जास्त पैसे खर्च करायला आवडत नाहीत. कारण जर ट्रेंड गेला तर ते पुन्हा वापरता येत नाहीत. तुम्ही ते परत घालणार नाही. मुलाखतीत घातलेल्या कपड्यांबद्दल विचारलं असता मृणाल म्हणाली, हे माझे कपडे नाहीत. मी यांचा वापर फक्त प्रमोशन्ससाठी करते. या टॉपसाठी जास्तीत जास्त मी २ हजार रुपये खर्च केले आहेत आणि तेही मला जास्त वाटत आहेत, असे ती म्हणाली. मृणाल म्हणाली, या महागातल्या गोष्टी जरी असल्या तरी तुम्ही त्या पुन्हा पुन्हा वापरू शकणार नाही. तुमच्याकडे क्लासिक कलेक्शन असायला हवं. पण ब्रँड आहे म्हणून कपडे घ्यायचे आणि आपले पैसे



फुकट घालवायचे. यापेक्षा ते पैसे मी खाण्यात, घर घेण्यात, एखादं रोपटं लावण्यात किंवा जमीन घेऊन त्यात शेती करण्यात खर्च करेन, असेही तिने सांगितले. माध्यमांसमोर मृणाल अनेकदा डिझायनर आऊटफिट्समध्ये दिसली आहे. याबद्दल विचारलं असता अभिनेत्री म्हणाली, की मी चीट करते. जर माझ्या कपाटात हजार गोष्टी असतील तर त्यातल्या पाच गोष्टी तरी स्टेटमेंट पीस असतात. मी टॉप, जीन्स घालते आणि शूज, बॅग यासारख्या स्टेटमेंट गोष्टी बदलत राहते. या गोष्टींचा समावेश केल्याने मी नेहमी वेगळी आणि छान दिसते आणि महागडे कपडे खरेदी करण्याचीही गरज लागत नाही. दरम्यान, मृणालच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, मृणाल ठाकूरचा आगामी चित्रपट 'फॅमिली स्टार' ५ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे.

# श्वेताने सांगितल्या कॉलेजच्या आठवणी

**अभिनेत्री ते निर्माती असा प्रवास करत श्वेता शिंदेने मराठी कलाविश्वात ओळख निर्माण केली. मराठीसह हिंदी मालिकांमध्ये तिने स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. गेल्या काही वर्षांत 'लागिर झालं जी', 'मिसेस मुख्यमंत्री', 'देवमाणूस' अशा एकापेक्षा एक दर्जेदार मालिकांची निर्मिती तिने केली. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत श्वेताने तिच्या महाविद्यालयीन दिवसांतील आठवणी सांगितल्या...**




श्वेता शिंदे म्हणाली, माझा जन्म साताऱ्याचा आहे. पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण साताऱ्यात झालं. माझे आई-वडील तिकडेच असतात. आमचं तिथे कल्पतरू नावाचं छान असं टुमदार घर आहे. त्या घराशी माझं खूप जवळचं नातं आहे. कॉलेजमध्ये जायची वेळ आली तेव्हा असं वाटलं, आता आपण कुठेतरी साताऱ्यातून बाहेर पडलं पाहिजे. म्हणून, मी मुंबई किंवा पुण्यातील महाविद्यालयात प्रवेश घ्यायचं ठरवलं. सुरुवातीला माझ्या वडिलांचा बाहेर शिक्षण घ्यायला विरोध होता. ते नाही म्हणत होते पण, बाहेर जायचं यावर मी ठाम होते. माझ्या आईची सुद्धा अशीच इच्छा होती. त्यामुळे पुढे मी मुंबईतील मिठीबाई महाविद्यालयात प्रवेश घेतला. साताऱ्यातून बाहेर पडून थेट मिठीबाई कॉलेज हा माझ्यासाठी सांस्कृतिकदृष्ट्या खूप मोठा शॉक होता. मिठीबाईमध्ये येऊन मला एक वेगळं विश्व, एक वेगळी दुनिया या सगळ्या गोष्टी जाणवल्या. त्यामुळे सुरुवातीला सगळ्या गोष्टी जुळवून घ्यायला थोडा वेळ लागला. पण, माझं शिक्षण कॉन्व्हेंट शाळेतून झाल्यामुळे एवढाही त्रास झाला नाही. माझं कॉलेज खूप जास्त ग्लॅमरस असल्याने मला शिक्षणानंतर हळूहळू एक-एक ऑफर्स येऊ लागल्या, असं श्वेताने सांगितलं.

बॉलीवूड कलाकारांबरोबर असलेल्या खास कनेक्शनबद्दल श्वेता सांगते, की कॉलेजमध्ये करीना कपूर, शाहिद कपूर, इशिता भट या सगळ्यांना मी पाहिलंय. हे लोक सुद्धा मिठीबाईला होते. अजय देवगण, करिश्मा कपूर मला एक बॅच सिनिअर होते. विवेक ओबेरॉय माझ्यापेक्षा दोन बॅच सिनिअर होता. आताचे हे आघाडीचे कलाकार तेव्हा कॉलेजमध्ये खूप सक्रिय होते. नाटक असो किंवा फॅशन शो सगळ्यात त्यांचा सहभाग असायचा. मी सुद्धा फॅशन शोमध्ये काम केलं पण, या गोष्टी माझ्या घरी माहिती नव्हत्या. असाच एक फॅशन शो करताना मला टेलिव्हिजनची ऑफर आली. अशाप्रकारे कलाविश्वातील प्रवास सुरू झाल्याचं श्वेता शिंदेने सांगितलं.

# अक्षया गुरवे सांगितला इंडस्ट्रीतील वाईट अनुभव

'मेंदीच्या पानावर', 'मानसीचा चित्रकार तो', 'राधा प्रेम रंगी रंगली', 'लव्ह लग्न लोचा' अशा मालिकांमधून अभिनेत्री अक्षया गुरवने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून तिला ओळखलं जातं. तिच्या सहज व सुंदर अभिनयाचे हजारो चाहते आहेत. मालिकांशिवाय अक्षयाने बऱ्याच मराठी चित्रपटांमध्येही काम केलेलं आहे. याशिवाय तिने काही दिवसांपूर्वीच 'आई कुठे काय करते' या लोकप्रिय मालिकेत एन्ट्री घेतली होती. तिने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत इंडस्ट्रीत आलेल्या बऱ्याच अनुभवांबाबत अभिनेत्रीने भाष्य केलं...

मध्यंतरीच्या काळात इंडस्ट्रीपासून तू दूर होतीस का? या प्रश्नावर अक्षया म्हणाली, हो...मी सलग चित्रपट केले नाहीत. पण, आजवर जी कामं केली आहेत ती सगळी उत्तमप्रकारे करून काहीशा वेगळ्या धाटणीच्या भूमिका मी निवडल्या होत्या. प्रत्येक कलाकाराच्या आयुष्यात एक संघर्षाचा किंवा वाईट काळ येतो. तसाच माझ्याही आयुष्यात आला होता, तेव्हाच माणूस स्वतःच्या पायावर उभा राहायला शिकतो. गेल्यावर्षी माझ्या नवऱ्याचं ऑपरेशन झालं होतं आणि आम्ही दोघंही एकाच इंडस्ट्रीत काम करतो. ऑपरेशन झाल्याने तो जवळपास ५ ते ६ महिने घरी होता आणि त्या काळात माझ्याकडे काही कामच नव्हतं, असे ती म्हणाली. अक्षया म्हणाली, की तो काळ माझ्या आयुष्यातील सगळ्यात वाईट काळ होता. मी काही लोकांना सांगितलं होतं की, प्लीज काम द्या. त्या दिवसांमध्ये मी कोणतीही भूमिका करण्यासाठी तयार होते. कारण, प्रत्येक कलाकारासाठी काम खूप महत्त्वाचं असतं. त्या मधल्या काळात मला एका शोसाठी ऑफर आली होती. मोठं चॅनेल आहे, त्यामुळे मी नाव घेणार नाही. त्यांनी मला फायनल केलं, लूक टेस्ट, मॉक शो झाले. संपूर्ण प्रक्रिया पार पडली आणि अचानक आदल्या रात्री मला फोन करून सांगितलं तुझ्याबरोबर आम्ही काम करणार नाही. आम्ही त्या पात्रासाठी दुसरी अभिनेत्री कास्ट केली आहे. मला त्या प्रसंगानंतर खरंच खूप जास्त वाईट वाटलं होतं. कारण, कमिटमेंट केली जाते, अग्रीमेंट साइन केलं, त्या मालिकेसाठी मी एक हिंदी वेबसीरिज सोडली होती. त्यात माझ्या घरी कठीण काळ सुरू होता. मी खरंच तेव्हा खूप जास्त खचले. मी रडले नाही... पण, माझ्या मनाला ती गोष्ट प्रचंड लागली. कदाचित ते पात्र माझ्यासाठी नव्हतं आणि तो शो आता बंद होतोय. ज्या शोसाठी मला विचारलं, पुढे जाऊन काढलं, दुसऱ्या अभिनेत्रीला कास्ट केलं त्याबद्दल यापेक्षा जास्त मला काही बोलायचं नाहीये. आज पहिल्यांदाच मी याबद्दल एवढं सगळं बोलले आहे, असं अक्षया गुरवने स्पष्ट केलं आहे.



## शॉर्ट न्यूज

### भारतरत्न डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**संगमनेर :** शहर व तालुक्यात भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ. डॉ सुधीर तांबे, दुर्गा तांबे, डॉ. जयश्री थोरात, उत्कर्षा रुपवते, प्राचार्य हिरालाल पगडाल आदींसह भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान, राष्ट्रीय दलित पँथर, जयंती महोत्सव समितीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती निमित्ताने मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

### जबरी चोरीचा प्रयत्न केलेले आरोपी गजाआड

**राहुरी :** तालुक्यातील वांबोरी येथील सत्रे वस्तीवर रात्रीच्या सुमारास उषाबाई सत्रे या घरापासून लांब अंतरावर शौचालयाला जात होत्या. त्यावेळी अज्ञात दोन चोरट्यांनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले होते. तसेच त्यांच्या अंगावरील दागिणे ओरबडण्याचा प्रयत्न केला होता. या गुन्ह्यातील आरोपी रवींद्र पोपट सत्रे (रा. सत्रे वस्ती, कात्रड) तसेच किरण संजय राऊत (रा. राऊत वस्ती, वांबोरी) या दोघांना ताब्यात घेतले. राहुरी येथील न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### भानेश्वर विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

**श्रीगोंदा :** भानगाव (ता. श्रीगोंदा) येथील श्री भानेश्वर विद्यालयाच्या आर्या संतोष जाधव, सिद्धी बापूराव व्यवहारे, अक्षदा नानासाहेब कांबळे यांनी एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून केंद्र शासन शिष्यवृत्ती यादीत स्थान पटकाविले. त्यांना पाच वर्षासाठी वार्षिक बारा हजार रूपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. तीस विद्यार्थी महाराष्ट्र शासनाकडून मिळत असलेल्या सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले आहेत. त्यांना चार वर्षांसाठी वार्षिक ९ हजार ५०० रूपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

### साई सावली अनाथाश्रमात मुलांना फळाचे वाटप

**राहाता :** तालुक्यातील पुणतांबा फाट्याजवळ असणाऱ्या एस जे एस रुग्णालयाचे कार्यकारी संचालक व आर जे एस फाउंडेशनचे सचिव प्रसाद कातकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शिर्डी येथील साई सावली अनाथ आश्रमातील लहान मुलामुलींना फळे वाटून त्यांच्या आरोग्याची तपासणी श्री जनार्दन स्वामी रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. व त्याच दिवशी कोपरगाव बेट येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यात वयोवृद्धापासून ते युवा पिढीने या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरात जवळपास पाचशेच्या अधिक लोकांनी लाभ घेतला.

### घरफोडीतील संशयित आरोपी ताब्यात

**श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड नं. ७, परिसरात बँक अधिकारी रवींद्र हरकल यांच्या घरी झालेल्या घरफोडीचा पोलिसांनी तपास करून दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. हरकल हे ईदनिमित्त गुरुवारी रात्री मित्राच्या घरी गेले होते. चोरट्यांनी घर बंद असल्याचे हेरून १५ ते २० मिनिटांत घराचा कडी- कोंडा व कुलपे तोडून घरातील दहा हजार रोख रक्कम तसेच सोन्याचे दागिने असा सुमारे दोन लाखांचा ऐवज चोरून नेला होता. सीसीटीव्हीच्या फुटेजवरून व पळालेला आरोपीच्या वर्णनावरून पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेतले आहे.

# सूज्ञ जनता विकास कामाला साथ देते, पोपटपंची करणाऱ्यांना नाही - खा.डॉ.सुजय विखे



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**अहिल्यानगर लोकसभा मतदार संघातील सूज्ञ असून, पाच वर्षात झालेली विकास काम जनतेच्या समोर आहे.त्यामुळे महायुतीलाच जनतेचे पाठबळ असल्याने पोपटपंची आणि भूलथापा देणाऱ्यांना थारा देणार नाही असा विश्वास खा.डॉ सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.**

तालुक्यातील काष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खा.विखे पाटील बोलत होते.माजी मंत्री आ.बबनराव पाचपुते,विक्रमसिंह पाचपुते यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

आपल्या भाषणात खा.विखे म्हणाले की लोकसभा निवडणुक देशाचे भवितव्य ठरवणारी आहे.विकास कामांवर ही निवडणूक होत आहे. कोव्हीड कालावधी सोडला तर केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विकास कामाचा निधी आणला. लोकासाठी असलेल्या प्रत्येक योजनेचा लाभ सामान्य माणसाला देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले.

या लोकसभा मतदारसंघाची परंपरा पाहीली तर काम करणाऱ्या लोकांना साथ देण्याची मतदारसंघातील जनता सूज्ञ असल्याकडे लक्ष वेधून प्रामाणिक स्वाभिमानी नैतिकता असलेल्या उमेदवाराला मत टाकण्याची भूमिका आजपर्यंत मतदारांनी बजावली. देशात पुन्हा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी जनतेचा निर्धार झाला आहे.त्यामुळे महायुतीच्या उमेदवाराला मिळणारे प्रत्येक मत केंद्रात पुन्हा भाजपाची सता येण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार असल्याचे विखे पाटील म्हणाले.
सध्या कुठल्याही कार्यक्रमात फक्त निवडणुकीची चर्चा सुरू असल्याने कार्यकर्त्यांनी नकारात्मक चर्चेपासून दूर राहावे. पाच वर्षात तालुक्यात झालेल्या विकास कामाची आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णयांची माहीती जनतेला द्या असे आवाहन त्यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानोदयाचा अथांग अविष्कार

## प्राचार्य डॉ. शरद पारखे यांचे प्रतिपादन

**चोंभुत : प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात अखंड विवेकी ज्ञानाची परंपरा निर्माण केली. अस्पृश्योद्धार, सामाजिक कार्य, राजकीय चिंतन, धर्मचिकित्सा, सांस्कृतिक परिवर्तन अशा अनेकविध क्षेत्रात आपले योगदान दिले. भारतीय राज्यघटनेच्या रूपाने अखंड भारत देश एका सूत्रात बांधण्याचे काम बाबासाहेबांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारतातील ज्ञानोदयाचा एक अथांग अविष्कारच आहे असे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी येथे सांस्कृतिक विभागाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी अध्यक्षस्थानाहून बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र कथन करताना आजच्या पिढीस आवश्यक विचारांची गरज प्रतिपादन केली. याप्रसंगी इंग्रजी विभागप्रमुख प्रा. शर्मिष्ठा बोरुडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



यावेळी डॉ. कुंदा कवडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विशाल रोकडे, प्रा. रावसाहेब झावरे, डॉ. शांता थोरात, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुनिता भालेराव, प्रा. राजाराम गोर्डे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज, मच्छिंद्र म्हस्कुले, वैजनाथ आवारी आदी मान्यवर व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रा.स्वाती फापाळे तर आभार प्रा.विशाल रोकडे यांनी मानले.

# अहिल्यादेवी होळकरांचे वंशज हाती तुतारी धरणार!

## भूषणसिंह होळकर शरद पवार गटात जाणार? पवारांच्या बेरजेच्या राजकारणाला वेग

**पुणे : प्रतिनिधी**

**शरद पवार हे त्यांच्या पक्षासाठी ताकदीने कामाला लागले आहेत. त्याची प्रचिती देखील पाहायला मिळत आहे. बेरजेचे राजकारण करताना त्यांनी आज सोलापूर-माढा लोकसभेत भाजपला धक्का दिला. धैर्यशिल मोहिते पाटील यांना पक्षात प्रवेश देत त्यांना माढा लोकसभेची उमेदवारी देखील जाहीर केली.**

**भूषणसिंह होळकर लवकरच पवार गटात?**
तोच आता शरद पवारांनी नवीन डाव टाकला आहे. पवारांनी आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशजांना सोबत घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अहिल्यादेवी होळकरांचे वंशज असलेले भूषणसिंह होळकर हे लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.

**स्टार प्रचारक म्हणून संधी मिळणार?**
लोकसभा निवडणुकीत भूषणसिंह होळकर हे शरद पवार गटाचे स्टार प्रचारक असतील. तसेच भूषणसिंह होळकर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी वर्णी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

**होळकरांच्या सातबाऱ्यावर पवारांचा डोळा?**
विशेष म्हणजे तीन वर्षांपूर्वी याच भूषणसिंह होळकर यांनी शरद पवार यांच्यावर टीकास्त्र डागले होते. मध्यंतरी जेजुरीतील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याच्या लोकार्पणाचा वाद चांगलाच गाजला होता. त्यावेळी शरद पवार यांच्या हस्ते लोकार्पणाला विरोध करण्यात आला होता. तेव्हा भूषणसिंह यांनी,



होळकरांच्या सातबाऱ्यावर पवार कुटुंबियांचा डोळा असल्याचा आरोप केला होता. मात्र, आता तेच भूषणसिंह होळकर हे शरद पवार गटात प्रवेश करणार आहेत.

**काकडे-थोपटेंची भेट घेऊन शत्रुत्व संपवले**
त्यामुळे शरद पवार यांनी आणखी एका विरोधकाला स्वत:च्या बाजूने वळवण्यात यश मिळवले आहे. यापूर्वी शरद पवार यांनी चंद्रराव तावरे, अनंत थोपटे आणि बारामतीमधील पवार कुटुंबीयाचे पारंपरिक विरोधक असलेल्या काकडे कुटुंबीयांची भेट घेऊन राजकीय शत्रुत्त्वाला तिलांजली दिली होती.

**धैर्यशील मोहिते यांचा राष्ट्रवादीत प्रवेश**
गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारणाचे केंद्रस्थान ठरत असलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात भाजपचे नेते धैर्यशील मोहिते पाटील यांनी रविवारी शरद पवार गटात प्रवेश केला. यानिमित्ताने मोहिते-पाटील घराण्याकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. मोहिते-पाटील घराणे पुहा शरद पवार यांच्यासोबत आल्याने राष्ट्रवादीची माढा आणि सोलापूरच्या राजकारणातील ताकद आणखीन वाढणार आहे.

# जिल्ह्यात टँकरची संख्या १५० च्या उंबरठ्यावर

## एप्रिल अखेर वाढ होण्याची शक्यता

**नगर : प्रतिनिधी**

**नगर जिल्ह्यात १४८ गावे आणि ७८३ वाड्यावस्त्यावरील ३ लाख ५ हजार ८६६ इतक्या लोकसंख्येची तहान भागवण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे १४९ टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जात आहे. दिवसेंदिवस टँकरच्या मागणीत वाढ होत असून एप्रिल अखेर टँकरच्या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.**

गेल्या वर्षी पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यात पाणी टंचाईची स्थिती गंभीर होऊ लागली आहे. आवश्यकतेनुसार पिण्याचे पाण्याचा पुरवठा करावा, टँकरचे प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकार्यांनी दिले आहेत. प्रक्रियेतील विलंब टाळण्यासाठी टँकर मंजुरीचे अधिकार प्रांताधिकाऱ्यांकडे आहेत.












# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीच्या दुचाकीवर सुजय विखे !

■ बाबासाहेब न्याय द्या ! मृत संतोष गायकवाड यांच्या पत्नीची आर्त हाक
■ आरोपींना पाठीशी घालणाऱ्या राजकीय नेत्यांवरही कारवाईची मागणी

पारनेर : प्रतिनिधी

**नारायणगव्हाण येथील संतोष बबन गायकवाड यांच्या हत्येच्या गुन्हयातील आरोपी अजिंक्यतारा दरेकर याच्या दुचाकीवर बसून खा. डॉ. सुजय विखे हे रॅलीत सहभागी झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, राजकारणी लोकांचे गुन्हेगारांना पाठबळ मिळत असल्याने मागासवर्गीय समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या संघर्षाला काहीच अर्थ राहिला नसल्याचे सांगत बाबासाहेब तुम्ही परत या मला न्याय मिळवून द्या अशी आर्त हाक मयत संतोष गायकवाड यांच्या पत्नी सुरेखा गायकवाड यांनी दिली.**



संगिता गायकवाड यांनी सांगितले की, मागासवर्गीय समाजावर होणारा अन्याय दुर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याचे ज्ञान घेतले. अन्यायाविरूध्द लढा दिला. त्यांच्या या लढयाचा आज काही उपयोग होत नसल्याचे दिसत आहे. माझ्या पतीची हत्या झाल्यानंतर त्यांचे मारेकरी काही दिवसांतच कोठडीबाहेर आले. ते आज मोकाट फिरत आहेत. त्यांना राजकारणी लोकांचा पाठींबा आहे हे पाहून अतिशय वाईट वाटते. आज माझे सासू सासरे आंथरूणाला खिळलेले आहेत. पतीची हत्या झाल्यानंतर आमच्यापुढे मोठे संकट उभे असतानाच पतीच्या मारेकऱ्यांपासून आमच्या कुटूंबाला धोका आहे. या आरोपींना तडीपार करण्यात यावे. त्यांना मदत करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनाही तडीपार करावे. राहुल शिंदे पाटील हे या आरोपींना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करीत आहेत. शिंदे पाटलांचीही चौकशी करून कारवाईची मागणी सुरेखा गायकवाड यांनी केली.

## खासदारसाहेब गुंडांना पाठीशी घालू नका

राहुल शिंदे पाटील हे या गुंडांना मदत करतात. खासदार साहेब, या गुंडांना तुम्ही पाठीशी घालू नका. मागासवर्गीय समाजाला न्याय द्या. या गुंडांपासून मला, माझ्या लेकरांना धोका आहे.

सुरेखा गायकवाड
मृत संतोष गायकवाड यांच्या पत्नी

## मारेकऱ्याच्या खांद्यावर खासदारांचा हात

माझ्या पतीची हत्या करणारे गुंड मोकाट आहेत. खासदार साहेब त्यांच्या खांद्यावर हात ठेउन फिरत आहेत. बाबासाहेब आम्हाला कोणी वाली राहिला नाही. बाबासाहेब तुम्ही परत या, मला न्याय द्या अशी मागणी सुरेखा गायकवाड यांनी केली.

## काय आहे प्रकरण ?

दि. २२ जुन २०२३ रोजी मृत संतोष गायकवाड हे नगर–पुणे महामार्गावरून रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पारनेर फाटयावरून नारायणगव्हाणकडे येत असताना तिघांनी दुचाकीवरून येत संतोष गायकवाड यांच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून त्यांची हत्या केली होती. या गुन्हयात अजिंक्यतारा दरेकर याच्यासह नऊ जणांविरोधात सुपा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल आहे. सध्या या आरोपींची जामीनावर सुटका झालेली आहे.

## डॉ. आंबेडकरांच्या जयंतीदिनी सुरेखा यांची हाक

शनिवार दि. १३ एप्रिल रोजी सुजय विखे यांच्या प्रचारार्थ नारायणगव्हाण परीसरात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या ठिकाणी जाताना काढण्यात आलेल्या रॅलीत खा. डॉ. सुजय विखे हे अजिंक्यतारा दरेकर याच्या दुचाकीवर बसलेले होते. त्याचे व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशीच सुरेखा दरेकर यांनी बाबासाहेब तुम्ही परत या, मला न्याय द्या अशी आर्त हाक घातली आहे.

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त चोंभुतला आरोग्य शिबिर

१११ ग्रामस्थांनी घेतला शिबिराचा लाभ

चोंभुत : प्रतिनिधी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती निमित्त चोंभुत येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.ग्रामस्थांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिरास प्रतिसाद देत जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्ध धम्म पद्धतीने पूजा पाठ संपन्न झाला.**



यावेळी डॉ.गायकवाड मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले यासाठी डॉ. प्रियंका गायकवाड व डॉ.निखिल शिंदे यांनी नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करत औषधोपचार केले या शिबिरामध्ये सुमारे १११ ग्रामस्थांनी व महिला भगिनींनी सहभाग घेतला.

यावेळी विविध कार्यकारी संस्थेचे चेअरमन दत्तात्रय कोल्हे,विविध कार्यकारी सोसायटी संचालक जनाजी म्हस्के,ग्रामपंचायत सदस्य स्वप्निल पारखे,विविध कार्यकारी सोसायटी संचालक देवराम जमदाडे, किसन गुंजाळ, खंडूशेठ म्हस्के, दत्तात्रय गाडेकर, मंगेश सोनवणे,अशोक म्हस्के ,तात्याभाऊ माळी,रामदास पारखे, शहाजी जाधव,आळकुटी ग्रामपंचायत सदस्य किरण शिंदे,नीलक्रांती तरुण मित्र मंडळाचे उपाध्यक्ष गणेश रामदास भालेराव खजिनदार संगम भालेराव,सचिव मंगेश भालेराव विजय भालेराव,राजू भालेराव गंगाराम भालेराव,ग्रामपंचायत सदस्य प्रनल पोपट भालेराव, सागर सोनवणे, प्रकाश मस्के, कैलास भालेराव व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## महामानवांचे विचार लोकोपयोगी

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला आम्ही आरोग्य शिबीर आयोजित केले त्याचा आम्हाला अभिमान आहे खऱ्या अर्थाने महामानवांचे विचार लोकोपयोगी आहेत असे समाजाप्रती माणने हाच आमचा एक हेतू आहे.

गणेश भालेराव, उपाध्यक्ष ,नीलक्रांती तरुण मित्र मंडळ, चोंभुत

# डॉ.आंबेडकरांनी समानतेसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले

■ विक्रमसिंह कळमकर यांचे प्रतिपादन ■ पाडळी रांजणगाव येथे आंबेडकर जयंती साजरी

पाडळी रांजणगाव : प्रतिनिधी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समानतेसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष तथा पाडळी रांजणगावचे सरपंच विक्रमसिंह कळमकर यांनी केले.**



पारनेर तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष तथा पाडळी रांजणगावचे सरपंच विक्रमसिंह कळमकर म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म हा १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. त्यावेळी भारतातील जातीव्यवस्था अतिशय कठोर होती. त्यामुळे बाबासाहेबांना लहानपणापासूनच भेदभावाला सामोरे जावे लागले होते.

शिक्षण क्षेत्रात खूप मेहनत घेत त्यांनी शिक्षणात प्रावीण्य मिळवले आणि कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट पदवी मिळवली.तसेच बाबासाहेबांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर ते भारतात परतले आणि कायद्याचा सराव सुरू केला. दलित समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांनी जातिव्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला आणि शिक्षण आणि रोजगाराच्या संधींमध्ये समानतेसाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

या कार्यक्रमाला तंटामुक्ती अध्यक्ष अप्पासाहेब साठे,व्हा. चेअरमन आप्पासाहेब कळमकर,माजी सरपंच मारुती उबाळे, माजी चेअरमन कचरू उबाळे, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, अर्चना करंजुले,सोसायटी संचालक संभाजी करंजुले,भगवान उघडे,कांतीलाल उबाळे,अरुण उबाळे,किरण साठे, सामाजिक कार्यकर्ते वसंतराव साठे, अप्पासाहेब फडके,दादाभाऊ करंजुले मेजर, सावळेराम साठे, अशोक उबाळे,भगवान करंजुले, सुभाष उबाळे, विठ्ठल करंजुले,हरिभाऊ उबाळे,हिराजी जाधव, नवनाथ पाटील, शुभम जाधव, अमोल जाधव,भाऊ करंजुले उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य अशोकराव जाधव व त्यांच्या सहकार्याने परिश्रम घेतले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे देशासाठी मोठे योगदान - सचिन वराळ पाटील

निघोज : प्रतिनिधी

**महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान तयार करताना तसेच भारतीय राज्यघटना तयार करताना सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात न्याय देण्याची भुमिका घेउन देशासाठी मोठे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी व्यक्त केले.**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथे बौद्ध विहार परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते बोलत होते. प्रसिद्ध कवी तसेच मुंबई - निघोज डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मृती संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक बबनराव सोनवणे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

वराळ पाटील, अस्लमभाई इनामदार, सोनवणे सर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी दिलीप सोनवणे, महेंद्र गायकवाड, महादेव सोनवणे, प्रकाश सोनवणे, अस्लमभाई इनामदार, भास्कर सोनवणे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वराळ पाटील यावेळी म्हणाले स्वातंत्र्य मिळवताना जेवढे योगदान स्वातंत्र्य सैनिकांनी दिले तशाच प्रकारे डॉ आंबेडकर यांनी राज्यघटना तयार करीत सर्वसमावेशक आणि सर्वच समाजबांधवांना या राज्यघटनेचा फायदा समप्रमाणात होण्यासाठी त्यांनी योगदान दिले म्हणून आज देशाचा क्रमांक जगात टॉप टेन मध्ये आहे याला सर्वाधिक महत्त्व राज्यघटनेला देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

प्रसिद्ध कवी व डॉ.आंबेडकर स्मृती संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक बबबराव सोनवणे यावेळी म्हणाले देशात माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरूसारखे अनेक दिग्गज नेते असताना सर्वांनीच एकमताने डॉ. आंबेडकर यांना राज्यघटना तयार करण्याचा अधिकार दिला हेच सर्वसमावेशक गुण त्यांच्यामध्ये होते म्हणून एक आदर्श संविधान म्हणून भारताची ओळख जगात असल्याचे प्रतिपादन सोनवणे यांनी व्यक्त केले.



# समृद्ध पारनेर,सुरक्षित पारनेरसाठी प्रयत्न करू

खा.डॉ.सुजय विखे पाटील यांचा विश्वास



सुपा : प्रतिनिधी

**विकास प्रक्रियेत आड येणारी प्रवृत्ती तालुक्यातून बाजुला करण्याची हीच वेळ आहे. एकदा चुक केली आता पुन्हा करू नका, गणिमीकाव्याने परिवर्तन करून, समृध्द पारनेर, सुरक्षति पारनेर निर्माण करण्यासाठी आपण सर्वजण पुन्हा एकदा प्रयत्न करू. या तालुक्याचे उज्जल भविष्य घडवू असा विश्वास महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.**

सुपा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खासदार डॉ.विखे पाटील यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. याप्रसंगी भाजपाचे तालुका अध्यक्ष राहुल शिंदे, विश्वनाथ कोरडे, काशिनाथ दाते, शिवसेनेचे विकास रोहोकले, कल्याणशेठ शहाणे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल, आश्विनी थोरात आदी पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात खासदार डॉ.विखे पाटील म्हणाले की, ज्यांची सुरुवातच विश्वासघातेने झाली आहे ते तालुक्याला कोणता विश्वास देणार असा प्रश्न उपस्थित करून, आपल्याकडे फक्त प्रेमापोटी माणसं आहेत, भाडोत्री माणसांवर राजकारण करण्याची पध्दत आपल्याकडे नाही. तालुक्यात फक्त धमक्या देण्याचे काम सुरु आहे. घाबरुन जावू नका. या तालुक्यातील जनतेच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची भूमिका कालही घेतली आणि उद्याही घेवू.

आज युवकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. ही सर्व युवा शक्ती एका विचाराने आपल्याबरोबर आली आहे. कारण आपल्याकडे कोणीही गुन्हेंगार नाही. या तालुक्याचा सुसंस्कृतपणा पुन्हा एकदा आपल्याला दाखवून द्यायचा आहे. त्यामुळेच समृध्द पारनेर आणि सुरक्षित पारनेर हा मंत्र घेवून भविष्याच्या दृष्टीने काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

मंगलदास बांदल याप्रसंगी म्हणाले की, या तालुक्याला समृध्द अशी विचारांची परंपरा आहे. नगर जिल्ह्याला शरद पवार जाणीवपूर्वक त्रास देत आहेत. ही निवडणूक केवळ सुजय विखे पाटलांची नाहीतर नरेंद्र मोदी विरुध्द शरद पवार अशी आहे. याचे गांभीर्य मतदारांनी ठेवले पाहीजे. विखे पाटील कुटूंबियांचे काम गेली अनेक वर्षे आपण पाहात आहोत. मोठी परंपरा त्यांची असल्याचे त्यांनी सांगितले.

राहुल शिंदे यावेळी म्हणाले की, विरोधी उमेदवारा बरोबर असलेले कार्यकर्तेच आज त्यांची पोलखोल करीत आहे. एकही कार्यकर्ता त्यांच्या बरोबर राहायला तयार नाही. आमदारकीचा राजीनामा देवून त्यांनी तालुक्याचा अनादर केला. त्यांनी उभे केलेले कोव्हीड सेंटर शासनाचे होते की प्रतिष्ठानचे हा प्रश्न अजुनही अनुत्तरीत आहे. कोव्हीड सेंटरमध्ये मृत्यु झाल्याचे आकडे कुठे गेले असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादीचे अध्यक्ष विक्रम कळमकर यांनी मागील साडेचार वर्षात कार्यकर्त्यांच्या वाटेला फक्त अवहेलना आल्याचे सांगत ही देशाची निवडणूक आहे. देशाची धोरण ठरविण्यासाठी खा.डॉ.सुजय विखे पाटील यांच्या सारखे नेतृत्व संसदेत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या मेळाव्यास युवक कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विक्रम कळमकरांना पंधरा दिवसातच गावातून दे धक्का !

■ गावचे उपसरपंच, सदस्य तसेच सोसायटी चेअरमन व संचालकांनी सोडली साथ ■ नीलेश लंके यांच्या गोटात डेरेदाखल

पाडळी रांजणगाव : प्रतिनिधी

**नीलेश लंके यांच्या माध्यमातून पाडळी रांजणगावमध्ये कोट्यावधी रुपयांची विकास कामे मार्गी लागलेली असतानाही केवळ स्वतःच्या राजकीय स्वार्थापोटी लंके यांची साथ सोडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात दाखल झालेल्या व त्यानंतर पक्षाच्या तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारलेल्या विक्रमसिंह कळमकर यांची कवचकुंडले पंधरा दिवसातच त्यांच्या गावातूनच निखळली आहेत !**



विक्रमसिंह कळमकर यांनी नीलेश लंके यांची साथ सोडून अजित पवार गटात प्रवेश करण्याचा एकतर्फे निर्णय घेतल्यानंतर त्याचे पडसाद त्यांच्या गाव पातळीवर उमटले. सरपंच विक्रमसिंह कळमकर यांनी मागणी केल्याप्रमाणे नीलेश लंके यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी दिलेला असतानाही केवळ स्वतःच्या राजकीय स्वार्थापोटी किंवा यापूर्वी केलेल्या विविध निवडणुकीतील तडजोडीसाठी विक्रमसिंह यांनी कोणालाही विचारात न घेता लंके यांची साथ सोडली. अजित पवार गटात प्रवेश करण्याचा व पर्यायाने तालुक्यातील लोकसभेचे उमेदवार नीलेश लंके यांना विरोध करण्याचा निर्णय घेतला. कळमकर यांनी मागील पंचायत समिती निवडणुकीत पक्षाच्या ध्येय धोरणांना तिलांजली देत अपक्ष उमेदवारी करत पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करण्याचे काम केले होते. पुढे बाजार समितीची निवडणूक तसेच सैनिक बँकेच्या निवडणुकीतही त्यांनी लंके यांच्या सहकाऱ्यांना विरोधात काम केल्याची चर्चा आहे. असे असताना कळमकर यांनी विखे यांना साथ देण्याचा घेतलेला निर्णय त्यांनी यापूर्वी पक्ष विरोधी कारवयांशी सुसंगत असल्याची प्रतिक्रिया गावचे ग्रामस्थ देत आहेत.

दरम्यान, कळमकर यांची भूमिका न पडल्याने शनिवारी नीलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा श्रीगोंदा तालुक्यातील माठ या ठिकाणी आली असता पाडळीच्या ग्रामस्थांनी नीलेश लंके यांची भेट घेतली. तुम्हाला गावातून जास्तीत जास्त मताधिक्य देण्याची ग्वाही दिली.

यावेळी पाडळीच्या विद्यमान उपसरपंच वैशाली करंजुले,सेवा संस्थेचे चेअरमन डी. बी. करंजुले,विठ्ठल साठे, किरण साठे, नितीन साठे, राजू साठे, सदाशिव कळमकर प्रथम करंजुले, गणेश करंजुले, कारभारी पोटघन, सतीश भालेकर आदी उपस्थित होते.

## विक्रमला आम्हीच राजकारणात मोठे केले !

आमच्या गावातून कोणी कुठेही कोणत्याही पक्षात प्रवेश केला असला तरी त्यामूळे आपल्या मतदानावर काही फरक पडणार नाही. राजकारणात आम्हीच विक्रमला मोठे केले होते, याची आठवणही ग्रामस्थांनी यावेळी करून दिली.

## पाडळीकर संकट काळात साथ सोडत नाहीत

नीलेश लंके यांच्या रूपाने देश स्वतंत्र झाल्यानंतर पारनेर तालुक्याचा प्रथमच खासदार होणार आहे. मतदार संघातील सर्वसामान्य जनता आपल्या माणसाला डोक्यावर घेत असताना घरातले माणसे अमिषाला बळी पडत असतील तर ही संस्कृती सेनापती बापट, अण्णा हजारे यांच्या तालुक्याला कधीही मान्य होणार नाही. पाडळीकर संकट काळात साथ सोडणारे नाहीत तर साथ देणारे म्हणून सदैव स्मरणात राहतील. मताधिक्य देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

डी.बी.करंजुले, चेअरमन

## आमचा विश्वासघात केला

आम्हाला विश्वासात न घेता चुकीचा विक्रम यांनी निर्णय घेतला. आम्ही या निर्णयाशी विक्रम कळमकर यांच्या सोबत नाही. पाडळी रांजणगावचे स्वाभिमानी ग्रामस्थ लंके साहेबांसोबत कायम राहणार आहेत. तालुक्याचा स्वाभिमान म्हणून त्यांना आम्ही जास्तीत जास्त मताधिक्य देणार आहोत.

विठ्ठल साठे

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com